जळगाव दि.२६ नोव्हेंबर - राज्याचे महसुल व कृषि मंत्री एकनाथराव खडसे यानी मुंबई शहरावरील अतिरेक्यांचा भ्याड हल्ला परतउन लावताना शहीद झालेले पोलीस अधिकारी व जवान तसेच अतिरेक्यांचा हल्ल्यात बळी पडलेले निरपराध नागरिक यांच्या स्मृतीस अभिवादन केले आहे. त्यांचे बलिदान हे देशासाठी सर्वोच्च आणि प्रेरणादायी आहे,असे खडसे यांनी म्हटले आहे.